आकस्मिक अरिष्टाचे निरसन करणारा
भक्तिवात्सल्याने रसरसलेला,

# श्रीगुरूचरित्र अध्याय चौदावा

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरूभ्यो नमः ॥ नामधारक शिष्य देखा । विनवी सिद्धासी कवतुका । प्रश्न करी अतिविशेखा । एकचित्तें परियेसा ॥ १ ॥ जय जया योगीश्वरा । सिद्धमूर्ति ज्ञानसागरा । पुढील



Scanned by CamScanner

चरित्र विस्तारा । ज्ञान होय आम्हांसी ।। २ ।। उदरव्यथेच्या ब्राह्मणासी । प्रसन्न जाहले कृपेसीं । पुढें कथा वर्तली कैसी । विस्तारावें आम्हांप्रति ।। ३ ।। ऐकोनि शिष्याचें वचन । संतोष करी सिद्ध आपण । गुरूचरित्र कामधेनु जाण । सांगता जाहला विस्तारें ।। ४ ।। ऐक शिष्या शिखामणि । भिक्षा केली ज्याचे भुवनीं ।



तयावरी संतोषोनि । प्रसन्न जाहले परियेसा ।। ५ ।। गुरूभक्तीचा प्रकारू । पूर्ण जाणे तो द्विजवरू । पूजा केली विचित्रु । म्हणोनि आनंद परियेसा ।। ६ ।। तया सायंदेव द्विजासी । श्रीगुरू बोलती संतोषीं । भक्त हो रे वंशोवंशीं । माझी प्रीति तुजवरी ।। ७ ।। ऐकोनि श्रीगुरूचें वचन । सायंदेव विप्र करी नमन ।



Scanned by CamScanner

माथा ठेवून चरणीं । न्यासिता झाला पुनःपुन्हा ।। ८ ।। जय जया जगद्गुरू । त्रयमूर्तीचा अवतारू । अविद्यामाया दिससी नरू । वेदां अगोचर तुझी महिमा ।। ९ ।। विश्वव्यापक तूंचि होसी । ब्रह्मा-विष्णू-व्योमकेशी । धरिला वेष तूं मानुषी । भक्तजन तारावया ।। १० ।। तुझी महिमा वर्णावयासी । शक्ती कैंची आम्हांसी । मागेन एक आतां



तुम्हांसी । तें कृपा करणें गुरूमुर्ति ।। ११ ।। माझे वंशपारंपरीं । भक्ती द्यावी निर्धारीं । इह सौख्य पुत्रपौत्रीं । उपरी द्यावी सद्गति ।। १२ ।। ऐसी विनंति करूनी । पुनरपि विनवी करूणावचनीं । सेवा करितो द्वारयवनीं । महाशूरक्रूर असे ।। १३ ।। प्रतिसंवत्सरीं ब्राह्मणासी । घात करितो जीवेसीं । याचि कारणें



Scanned by CamScanner

आम्हांसी । बोलावीतसे मज आजि ॥ १४ ॥ जातां तया जवळी आपण । निश्चयें घेईल माझा प्राण । भेटी जाहली तुमचे चरण । मरण कैंचें आपणासी ॥ १५ ॥ संतोषोनि श्रीगुरूमूर्ति । अभयंकर आपुले हातीं । विप्रमस्तकीं ठेविती । चिंता न करीं म्हणोनियां ॥ १६ ॥ भय सांडूनि तुवां जावें । क्रूर यवना भेटावें । संतोषोनि



प्रियभावें । पुनरपि पाठवील आम्हांपाशी ॥ १७ ॥ जंववरी तूं परतोनि येसी । असों आम्ही भरंवसीं । तुवां आलिया संतोषीं । जाऊं आम्ही येथोनि ॥ १८ ॥ निजभक्त आमुचा तूं होसी । पारंपरवंशोवंशीं । अखिलाभीष्ट तूं पावसी । वाढेल संतति तुझी बहुत ॥ १९ ॥ तुझे वंशपारंपरीं । सुखें नांदती पुत्रपौत्रीं । अखंड



Scanned by CamScanner

लक्ष्मी तयां घरीं । निरोगी होती शतायुषी ॥ २० ॥ ऐसा वर लाधोन । निघे सायंदेव ब्राह्मण । जेथें होता तो यवन । गेला त्वरित तयाजवळी ॥ २१ ॥ कालांतक यम जैसा । यवन दुष्ट परियेसा । ब्राह्मणातें पाहतां कैसा । ज्वालारूप होता जाहला ॥ २२ ॥ विमुख होऊनि गृहांत । गेला यवन कोपत । विप्र जाहला भयचकित । मनीं श्रीगुरूसी



ध्यातसे ॥ २३ ॥ कोप आलिया ओळंबयासी । केवीं स्पर्शे अग्नीसी । श्रीगुरुकृपा होय ज्यासी । काय करील क्रूर दुष्ट ॥ २४ ॥ गरूडाचिया पिलियांसी । सर्प तो कवणेपरी ग्रासी । तैसें तया ब्राह्मणासी । असे कृपा श्रीगुरूची ॥ २५ ॥ कां एखादे सिंहासी । ऐरावत केवीं ग्रासी । श्रीगुरूकृपा होय ज्यासी । कलिकाळाचें भय



Scanned by CamScanner

नाहीं ॥ २६ ॥ ज्याचे हृदयीं श्रीगुरूस्मरण । त्यासी कैंचें भय दारूण । काळमृत्यु न बाधे जाण । अपमृत्यु काय करी ॥ २७ ॥ ज्यासि नाहीं मृत्यूचें भय । त्यासी यवन असे तो काय । श्रीगुरूकृपा ज्यासी होय । यमाचें मुख्य भय नाहीं ॥ २८ ॥ ऐसेपरी तो यवन । अंत:पुरांत जाऊन । सुषुप्ति केली भ्रमित होऊन ।



शरीरस्मरण त्यासी नाहीं ॥ २९ ॥ हृदयज्वाळा होय त्यासी । जागृत होवोनि परियेसीं । प्राणांतक व्यथेसीं । कष्टतसे तये वेळीं ॥ ३० ॥ स्मरण असें नसे कांहीं । म्हणे शस्त्रें मारितो घाई । छेदन करितो अवेव पाहीं । विप्र एक आपणासी ॥ ३१ ॥ स्मरण जाहलें तये वेळीं । धांवत गेला ब्राह्मणजवळी । लोळतसे



Scanned by CamScanner

चरणकमळीं । म्हणे स्वामी तूंचि माझा ।। ३२ ।। येथें पाचारिलें कवणीं । जावें त्वरित परतोनि । वस्त्रें भूषणें देवोनि । निरोप देतो तये वेळीं ।। ३३ ।। संतोषोनि द्विजवर । आला ग्रामा वेगवक्त्र । गंगातीरीं असे वासर । श्रीगुरूचे चरणदर्शना ।। ३४ ।। देखोनियां श्रीगुरूसी । नमन करी तो भोवसी । स्तोत्र करी बहुवसीं । सांगे



वृत्तान्त आद्यंत ।। ३५ ।। संतोषोनि श्रीगुरूमूर्ति । तया द्विजा आश्वासिती । दक्षिण देशा जाउं म्हणती । स्थान-स्थान तीर्थयात्रे ।। ३६ ।। ऐकोनि श्रीगुरूचें वचन । विनवीतसे कर जोडून । न विसंबें आतां तुमचे चरण । आपण येईन समागमें ।। ३७ ।। तुमचे चरणाविणें देखा । राहों न शके क्षण एका । संसारसागर



Scanned by CamScanner

तारका । तूंचि देखा कृपासिंधू ॥ ३८ ॥ उद्धरावया सगरांसी गंगा आणिली भूमीसी । तैसें स्वामीं आम्हांसी । दर्शन दिधलें आपुलें ॥ ३९ ॥ भक्तवत्सल तुझी ख्याति । आम्हां सोडणें काय नीति । सवें येऊं निश्चितीं । म्हणोनि चरणीं लागला ॥ ४० ॥ येणेंपरी श्रीगुरूसी । विनवी विप्र भावेसीं । संतोषोनि विनयेसीं ।



श्रीगुरू म्हणती तये वेळीं ॥ ४१ ॥ कारण असे आम्हां जाणें । तीर्थें असती दक्षिणे । पुनरपि तुम्हां दर्शन देणें । संवत्सरीं पंचदशीं ॥ ४२ ॥ आम्ही तुमचे गांवासमीपत । वास करूं हें निश्चित । कलत्र पुत्र इष्ट भ्रात । मिळोनि भेटा तुम्ही आम्हां ॥ ४३ ॥ न करा चिंता असाल सुखें । सकळ अरिष्टें गेली दुःखें । म्हणोनि



Scanned by CamScanner

हस्त ठेविती मस्तकें । भाक देती तये वेळीं ॥ ४४ ॥ ऐसेपरी संतोषोनि । श्रीगुरू निघाले तेथोनि । जेथें असे आरोग्यभवानी । वैजनाथ महाक्षेत्र ॥ ४५ ॥ समस्त शिष्यांसमवेत । श्रीगुरू आले तीर्थें पहात । प्रख्यात असे वैजनाथ । तेथें राहिले गुप्तरूपें ॥ ४६ ॥ नामधारक विनवी सिद्धासी । काय कारण गुप्त



व्हावयासी । होते शिष्य बहुवसी । त्यांसी कोठें ठेविलें ॥ ४७ ॥ गंगाधराचा नंदनु । सांगे गुरूचरित्र कामधेनु । सिद्धमुनि विस्तारून । सांगे नामकरणीस ॥ ४८ ॥ पुढील कथेचा विस्तारू । सांगतां विचित्र अपारू । मन करूनि एकाग्रु । ऐका श्रोते सकळिक हो ॥ ४९ ॥ इति श्रीगुरूचरित्रामृते परमकथा-



Scanned by CamScanner

कल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्ध-नामधारकसंवादे क्रूरयवनशासनं सायंदेवावरप्रदानं नाम चतुर्दशोऽध्याः ॥

श्रीगुरूदत्तात्रेयार्पणमस्तु ॥

श्रीगुरूदेवदत्त ॥



## करूणात्रिपदीतील पहिले पद

शांत होई श्रीगुरूदत्ता । मम चित्ता शमवी आता ॥ धृ० ॥ तूं केवळ माता जनिता । सर्वथा तूंचि हितकर्ता ॥ तूं आप्त स्वजन भ्राता । सर्वथा तूंचि रे त्राता। भयकर्ता तूं भयहर्ता। दंडधर्ता तूं परिपाता । तुजवांचुनि न दुजी वार्ता । तूं आर्ता आश्रयदाता ॥ शांत हो० ॥ १ ॥ अपराधास्तव गुरूनाथा । जरि दंडा धरिसि यथार्था। तरि आम्ही जाउनि गाथा । तव चरणीं नमवूं माथा । तूं तथापि दंडिसि



Scanned by CamScanner

देवा । कोणाचा मग करूं धावा। सोडविता दुसरा तेव्हां । कोण दत्ता आम्हां त्राता ॥ शांत हो० ॥२॥ तूं नटसा होउनि कोपी । दंडिताहि आम्ही पापी । पुनरपिही चुकत तथापि । आम्हांवरि नच संतापी । गच्छतः स्खलनं क्वापी । असें मानुनि नच हो कोपी निज कृपालेश रे ओपी । आम्हांवरि तूं भगवंता ॥ शांत हो० ॥ ३ ॥ तव पदरीं असता ताता । आडमार्गी पाउल पडतां । सांभाळुनि मार्गावरता । आणिता न दुसरा त्राता । निज बिरूदा आणुनि



चित्ता । तूं पतितपावन दत्ता । वळे आतां आम्हांवरता । करूणाघन तूं गुरूनाथा ॥ शांत हो० ॥ ४ ॥ सहकुटुंब सहपरिवार । दास आम्ही हे घरदार। तव पदीं अर्पु असार । संसाराहित हा भार । परिहरिसी करूणासिंधो । तूं दीनानाथ सुबंधो । आम्हां अघलेश न बाधो । वासुदेव प्रार्थित दत्ता ॥ शांत हो० ॥ ५ ॥



Scanned by CamScanner

# ॥ घोरकष्टोद्धरणस्तोत्रम् ॥

श्रीपादश्रीवल्लभ त्वं सदैव, श्रीदत्तास्मान्पाहि देवाधिदेव । भावग्राह्य क्लेशहारिन्सुकीर्ते, घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते ॥ १ ॥ त्वं नो माता त्वं पिताप्तोधिपस्त्वं, त्राता योगक्षेमकृत्सद्गुरूस्त्वम् । त्वं सर्वस्वं नो प्रभो विश्वमूर्ते, घोरात्काष्टादुद्धरास्मान्नमस्ते ॥ २ ॥ पापं तापं व्याधिमाधिं च दैन्यं, भीतिं क्लेशं त्वं हराऽशु त्वदन्यम् । त्रातारं नो वीक्ष ईशास्तजूर्ते, घोरात्काष्टादुद्धरास्मान्नमस्ते ॥ ३ ॥ नान्यस्त्राता नापि दाता न भर्ता, त्वत्तो देव त्वं शरण्योऽकहर्ता । कुर्वात्रेयानुग्रहं पूर्णराते, घोरात्काष्टादुद्धरास्मान्नमस्ते ॥ ४ ॥ धर्मे प्रीतीं सन्मतिं देवभक्तीं, सत्संगाप्ति देहि मुक्तिं च भुक्तिम् । भावासक्तिं चखिलानन्दमूर्ते, घोरात्काष्टादुद्धरास्मान्नमस्ते ॥ ५ ॥ श्लोकपंचकमेतद्यो लोकमंगलवर्धनम् । प्रपठेन्नियतो भवत्या व श्रीदत्तप्रियो भवेत् ॥ ६ ॥

॥ इति श्रीमद्वासुदेवानंदसरस्वतीकृत घोरकष्टोद्धरणस्तोत्रम् संपूर्णम् ॥

Scanned by CamScanner